# कृषी पर्यावरणी पद्धतीचा प्रसार

कर्नाटक राज्यातील कुंबलुरू गाव, तालुका हरिहरा जि. दावनगिरी येथील श्री. ए.एन. आंजनेय हे एक तरुण शेतकरी मागील १५ वर्षांपासून सेंद्रिय शेतीकडे वळले. आजारपणामध्ये हॉस्पिटलमध्ये असताना जेव्हा डॉक्टरकडून त्यांना सल्ला मिळाला की त्यांच्या आजाराचे प्रमुख कारण म्हणजे शेतीमधील वापरत असलेली घातक रसायने यापासून त्यांनी दूर रहावे. तेव्हापासून ते सेंद्रिय शेतीकडे वळले. तत्पूर्वी ते पारंपारिक पद्धतीने मोठ्या प्रमाणात रासायनिक खते व किटकनाशकांचा वापर करून धान शेती करीत होते.

जवळील जिल्ह्यामधील शिकारीपूरा येथील श्री. बी.एन. नंदीश या शेतकऱ्यांकडून आंजनेय यांना शेंगावर्गीय पिके (मुख्य पीक पेरणीपूर्वी जमिनीमध्ये हिरवळीच्या पिकांपासून खत निर्मिती) घेण्याची प्रेरणा मिळाली. योगायोगाने 'लिझा इंडिया'मध्ये बी.एन. नंदीश यांच्या शेंगवर्गीय हिरवळीचे खत संदर्भातील लेख 'शेंगवर्गीय हिरवळीचे खत व अनुभव' प्रकाशित झाला होता.

शेंगवर्गीय हिरवळीच्या खताबाबत माहिती मिळविण्याकरिता श्री. आंजनेय यांनी एस.के.डी.आर.डी.पी. सहजा या संस्थेकडे चौकशी केली. आंजनेय यांनी शेंगवर्गीय हिरवळीचे खत घेण्यास सुरवात केली व त्याचे खूप चांगले परिणाम त्यांना मिळाले. या प्रयोगापासून प्रेरणा घेत व श्री. आंजनेय यांच्याकडून तांत्रिक बाबींची माहिती घेऊन खूप शेतकऱ्यांनी या प्रयोगास सुरवात केली.

या प्रयोगाप्रती शेतकऱ्यांची रुची/आवड लक्षात घेता २००९ मध्ये कृषी विभागाने 'सराना मुद्दान्ना सवयावा कृषिकरा बलगा' या स्थानिक शेतकरी गटास सदर प्रयोगाचा मोठ्या प्रमाणावर प्रचार-प्रसार करण्याकरिता विशेष सहाय्य देऊ केले. सराना हा नोंदणीकृत सेंद्रीय शेतकरी गट असून पर्यावरणीय शेती संदर्भात खासकरून पारंपारिक धान पिकामध्ये कार्यरत आहे. या गटाने रसायनमुक्त शेती व सामूहिक विक्री व्यवस्था याबाबत कार्य सुरू केले. कुंबलुर गावामधील ३०० शेतकऱ्यांना सोबत घेऊन या गटाने धान प्रक्रिया व सामूहिक विक्री सुरू केली.

कृषी विभागाच्या सहयोगाने २००९ मध्ये शेंगवर्गीय हिरवळीची खते हा कार्यक्रम शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सुरू केला. गटामधील सदस्य हिरवळीचे खताकरिता प्रामुख्याने बोरू, ताग, धैंचा इत्यादी पिकाचा वापर करीत. श्री. आंजनेय यांनीसुद्धा आपल्या ४ एकर खारपट धानाच्या शेतीमध्ये सदर प्रयोगाचा विस्तार केला.

प्रत्येक वर्षी या प्रयोगामध्ये क्षेत्रफळ वाढत गेले. २०१० मध्ये ४० एकर, २०११ मध्ये १५०एकर, २०१२ मध्ये ४०० एकर, २०१३ मध्ये ६०० एकर व २०१४ मध्ये १२०० एकर. विभागामधील शेतकऱ्यांकडून या पद्धतीला मोठ्या प्रमाणात आत्मसात केले गेले. या संपूर्ण कामाची अंमलबजावणी व नियंत्रण सरांना/स्थानिक गटामार्फत झाली. गावामधील शेतकऱ्यांनी पुढील वर्षी या पद्धतीने १२,००० एकरावर धान पीक घेण्याचे ठरविले.

या पद्धतीमुळे २० टक्के लागत खर्चामध्ये बचत झाली. सोबतच जमिनीची सुपीकता व मातीमधील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. शेतकऱ्यांच्या निरीक्षणानुसार सदर पद्धतीमुळे रोग व किडींचे प्रमाणसुद्धा कमी झाले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी रासायनिक खताचा वापर थांबविला. श्री. आंजनेय व त्यांच्या सहकार्याच्या मते, **''सर्वात महत्त्वाचे म्हणजे मागील ५ वर्षामध्ये आरोग्याबाबत मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्यात.''** श्री. आंजनेय यांच्या या सर्व प्रयत्नामुळे राज्य शासनाचा मानाचा 'कृषी पंडित' त्याच बरोबर इतर नागरी पुरस्कारही त्यांना प्राप्त झालेत.

**Manjunath Holalu**
Organic farming consultant
C/o Razki building, Vinayaka Nagar, Savanur Road,
Shiggaon-581 205 Havari, Karnataka.
E-mail : manjubaduku@gmail.com

***Source:*** *Spread of an agroecological practice, LEISA India September 2016.*

मराठी अनुवाद : सुरेश लुले

आंजनेय त्यांच्या शेतावर

